MHAH230002142016

<u>नियमित दिवाणी दावा क्र. १०१/२०१६ मधील नि. ४१ वरील आदेश</u>

**भाऊसाहेब लक्ष्मण खेतमाळीस व इतर वि. अशोक मोतीराम खेतमाळीस व इतर**

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, दाव्याचे कामकाज चालु असतांना दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ दत्तु लक्ष्मण खेतमाळीस हे दिनांक १६/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा दावा प्रतिवादी नं.४ यांचेविरुध्द अबेट झाला आहे. वादीचे कथनानुसार, प्रतिवादी नं.४ चे वारस दाव्यात योग्य त्या मुदतीत अभिलेखावर घेणेकामी वादीने जाणीवपुर्वक टाळाटाळ अथवा विलंब केलेला नाही. वादी हे ग्रामीण भागात राहणारे अडाणी व अशिक्षित असल्यामुळे त्यांना कोर्टकचेरीचे कामाची जादा माहिती नाही. त्यातुन वादी यांनी माहितगार वकीलांना त्याबाबतची माहिती देवू शकले नाही त्यामुळे दावा प्रतिवादी नं.४ विरुध्द दावा अबेट झाला. प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी क्र.४ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द होणे गरजेचे आहे. झालेला उशिर जाणिवपुर्वक केलेला नाही. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्ज मंजुर होण्यास हरकत घेतली आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, वादींचा अर्ज खरा, बरोबर, कायदेशिर नाही. सबब, अर्ज रद्द करण्याची प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी यांनी नि. ४२ येथे प्रतिज्ञापत्र दाखल करुन कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ दिनांक १६/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. तसेच वादीतर्फे नि.४९ लगत सादर केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता

असे दिसुन येते की, प्रतिवादी नं.४ दत्तु लक्ष्मण खेतमाळीस हे दिनांक १६/०६/२०२१ रोजी माळीनगर, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे मयत झाले असून सदरचे प्रमाणपत्र दिनांक ०७/०७/२०२१ रोजी देण्यात आले आहे. प्रस्तुतचा अर्ज दि. २१/०६/२०२३ रोजी म्हणजेच एक वर्ष ११ महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे पाहता, प्रतिवादी क्र. ४ हे मयत झाल्याबाबत अभिलेखावर वाद नाही. प्रस्तुत दावा कब्जा, नुकसान भरपाई मिळणेसाठी,निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ चे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने प्रतिवादी क्र.४ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द करणे न्यायोचित ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज नि. ४१ प्रतिवादींना रक्कम रु.१०००/–कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची पुर्तता झाल्यानंतर मयत प्रतिवादी क्र.४ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द करण्यात येईल.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2023.07.01 17:54:04 +0530

श्रीगोंदा.
दिनांक ०१/०७/२०२३.

**( अ. ना. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.